जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २१६ | रविवार, १ मार्च २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210




## संक्षिप्त

### अजित दादांच्या विमान अपघाताचा अहवाल आला समोर

पुणे, ता. २८ : अजित दादांच्या विमान अपघाताबाबतचा प्राथमिक तपास अहवाल समोर आला असून दुर्घटनेपूर्वी विमान प्रथम झाडावर आदळले आणि त्यानंतर जमिनीवर कोसळल्याची माहिती त्यात नमूद आहे. अपघातानंतर ब्लॅक बॉक्समधील फ्लाईट डेटा रेकॉर्डर उष्णतेमुळे नुकसानग्रस्त झाला असला तरी काही महत्त्वाचा रॉ डेटा सुरक्षित असल्याचे समजते. अपघातावेळी दृष्यमानता सुमारे २००० मीटर इतकी होती. दोन्ही वैमानिकांना बारामती विमानतळ येथे विमान उतरविण्याचा अनुभव होता, अशी नोंद अहवालात आहे. दुर्घटनेच्या काही सेकँद आधी कॉकपीटम धील संभाषणात पायलटने तातडीचा मेडे कॉल न देता घाबरल्याचे उद्गार काढल्याची बाबही पुढे आली आहे. प्राथमिक निष्कर्षानुसार, हा अपघात केवळ एका कारणामुळे नव्हे तर हवामान, पायाभूत सुविधा आणि ऑपरेशनल निर्णय यांच्या एकत्रित परिणामामुळे घडल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. अंतिम कारणे सविस्तर तांत्रिक विश्लेषणानंतर स्पष्ट होणार आहेत.

# लोणी काळभोर व कदमवाकवस्तीतील कचऱ्यामुळे मुळा–मुठा नदी पेटली

## २४ तास धुमसणाऱ्या कचऱ्याने २५ हजार नागरिकांचे आरोग्य टांगणीला

**लोणी काळभोर, ता. २८ :** पुणे महानगरपालिकाचा कचरा लोणी काळभोरकरांच्या माथ्यावर मारला जात आहे. तर लोणी काळभोर व कदमवाकवस्ती ग्रामपंचायती गावात गोळा केलाला कचरा अनेक वर्षांपासून खुलेआम मुळा मुठा नदीपात्रात ताकत आहे. दोन्ही ग्रामपंचायतींच्या निष्क्रियतेमुळे मुळामुठा नदी अक्षरशः कचऱ्याचा ढिगारा बनली आहे. आणि या नदीपत्रातील कचऱ्याला शुक्रवारी (ता. २७) सकाळी साडेनऊच्या सुमारास अचानक आग लागली आणि तब्बल २४ तास उलटूनही ती धुमसत राहिली. धुराचे प्रचंड लोट परिसरात पसरल्याने एमआयटी विद्यापीठाच्या सुमारे १० हजार विद्यार्थ्यांसह १५ हजार नागरिकांचे आरोग्य टांगणीला लागले आहे.



कदमवाकवस्ती व लोणी काळभोर या दोन्ही ग्रामपंचायतींची लोकसंख्या प्रत्येकी ५० ते ६० हजारांच्या घरात आहे. गावात कचरा उचलण्यासाठी काही गाड्या कार्यरत असल्या, तरी तो केवळ दिखावा असल्याचे वास्तव समोर येत आहे. आदर पुनावाला स्वच्छ शहर मोहिमेअंतर्गत सहा गाड्या कचरा संकलन करत असल्या तरी ग्राम पंचायतींकडे कचऱ्याच्या शास्त्रोक्त विल्हेवाटीची कोणतीही ठोस यंत्रणा नाही. ना स्वतंत्र कचरा डेपो, ना प्रक्रिया प्रकल्प, ना शासकीय जागा! परिणामी, उचललेला कचरा थेट मुळामुठा नदीपात्रात फेकला जात आहे.

मुळा मुठा नदीपात्रातील कचऱ्याला शुक्रवारी सकाळी साडे नऊ वाजण्याच्या सुमारास अचानक आग लागली. बघता बघता धुराचे लोट ५ किलोमीटरच्या परिसरात पसरले. विषारी धुरामुळे परिसरात श्वास घेणे कठीण झाले, अनेकांना ठसका, डोळ्यांची जळजळ आणि श्वसनाचा त्रास जाणवू लागला. शैक्षणिक संकुलात आग लागल्याचा समज होऊन काही काळ गोंधळ उडाला; मात्र नंतर हा कचरा जाळल्याचे स्पष्ट झाले. ही केवळ निष्काळजीपणा नव्हे, तर पर्यावरण आणि नागरिकांच्या आरोग्याशी केलेला उघड खेळ आहे. आग नैसर्गिक कारणाने लागली की हेतुपुरस्सर लावली गेली, याची सखोल चौकशी व्हावी आणि जबाबदार अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

पूर्व हवेलीतील बहुतांश ग्राम पंचायतींनी मुळामुठा नदीला जणू अधिकृत कचरा डेपोच बनवले आहे. त्यामुळे ही जीवनदायिनी नदी गटारगंगा बनून वाहत आहे. नदीतील जलचर प्रजाती नामशेष होण्याच्या उंबरठ्यावर आहेत. नदीलगतच्या पाणीपुरवठा संस्थांच्या कार्यक्षेत्रातील लाखो एकर शेतीवर याचा गंभीर परिणाम होत असून शेतकरी चिंतेत सापडला आहे.

दरम्यान, कचऱ्याच्या विघटनासाठी काही स्थानिक उद्योजक पुढाकार घेण्यास तयार असतानाही प्रशासनाकडून ठोस प्रतिसाद मिळत नाही. गट-तट विसरून शासनस्तरावर पाठपुरावा केल्यास कचरा प्रक्रिया प्रकल्प उभा राहू शकतो आणि शेतकऱ्यांना स्वस्त दरात सेंद्रिय खत उपलब्ध होऊ शकते. मात्र, यासाठी संकुचित राजकारण बाजूला ठेवून प्रबळ इच्छाशक्ती दाखवावी लागेल. आता प्रश्न एकच आहे की, मुळामुठा वाचवण्यासाठी आणि नागरिकांच्या जीवितासाठी प्रशासन जागे होणार की आणखी एखाद्या आगीची वाट पाहणार? हे महत्वाचे ठरणार आहे.

### विशे कंपनीने कामगारांना दिली सुट्टी

मुळामुठा नदीपात्रातील कचऱ्याला लागलेल्या आगीमुळे परिसरात पसरलेल्या विषारी धुराचा परिणाम लक्षात घेता, विशे कंपनीने तातडीने निर्णय घेत कामगारांना सुट्टी जाहीर केली. धुरामुळे श्वसनाचा त्रास होण्याची शक्यता लक्षात घेऊन कंपनी प्रशासनाने उत्पादन थांबवत कामगारांच्या आरोग्याला प्राधान्य दिले. कंपनीच्या या निर्णयाचे कामगारांनी स्वागत केले आहे. मात्र अचानक जाहीर केलेल्या सुट्टीमुळे कंपनीचे उत्पादन ठप्प झाले असून कंपनीला आर्थिक फटका बसला आहे.

### महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सपशेल दुर्लक्ष?

एकीकडे नदीपात्रात कचरा टाकणाऱ्या काही गावांकडून लाखो रुपयांचा दंड वसूल केला जात आहे. मात्र लोणी काळभोर व कदमवाकवस्ती ग्राम पंचायतींकडून मुळामुठा नदीपात्रात टाकल्या जाणाऱ्या कचऱ्याकडे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळकडून सोयीस्कर दुर्लक्ष होत असल्याचे चित्र समोर येत आहे. पर्यावरणीय नियमांची अंमलबजावणी करताना दुजाभाव का केला जातो आहे? असा तीव्र सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे. सर्व ग्राम पंचायतींवर समान निकष लावून कठोर व निष्पक्ष कारवाई करावी, अन्यथा नदीपात्राचे होणारे कधीही नुकसान थांबणार नाही.

### पुण्यात बनावट औषध रॅकेटचा पर्दाफाश

**पुणे, ता. २८ :** जनतेच्या आरोग्याशी थेट खेळ करणाऱ्या बनावट औषधांच्या रॅकेटचा भांडाफोड झाला असून अलब्युरेल नावाचे औषध बाजारात बनावट स्वरूपात विक्री होत असल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणी पुणे, मुंबई, नागपूर आणि रायगड येथील पाच ठोक विक्रेत्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


ही कारवाई अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांच्या तपासातून समोर आली. पुणे विभागात कार्यरत औषध निरीक्षक श्रुतिका जाधव यांनी २८ जुलै २०२५ रोजी सदाशिव पेठ येथील मे. मैत्री फार्मास्युटीकल्स येथे अचानक तपासणी केली. तपासणीदरम्यान अलब्युरेल आणि रिच्यूएक्सरेल या औषधांचे नमुने जप्त करण्यात आले.

हे नमुने पुढील तपासासाठी शासकीय विश्लेषक, मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आले. प्राप्त अहवालानुसार अलब्युरेल हे औषध निर्धारित गुणवत्तेच्या चाचणीत अपयशी ठरले असून ते औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा१९४० च्या कलम १७ (ब) अन्वये बनावट घोषित करण्यात आले आहे. या प्रकरणामुळे औषध वितरण साखळीतील गंभीर त्रुटी समोर आल्या असून संबंधित विक्रेत्यांवर कठोर कारवाईची प्रक्रिया सुरू आहे.

# इंद्रायणी ब्रँडच्या खाद्यतेल व्यावसायिकाला पत्रकारांकडून १० लाखांच्या खंडणीची धमकी?

**फुरसुंगी, ता. २८ :** उरुळी देवाची (ता. हवेली) येथील परवानाधारक खाद्यतेल कंपनीत घुसून व्हिडीओ शूटिंग, पोलिसांचे नाव पुढे करून दबाव टाकून दोन कथित पत्रकारांनी १० लाख रुपयांची खंडणी मागितल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. यामुळे पुणे जिल्ह्यात एकच खळबळ उडाली असून अजूनही जिल्ह्यात बोगस पत्रकारांचा सुळसुळाट असल्याचे दिसून येत आहे. तर फुरसुंगी पोलीस ठाण्यात कथित पत्रकारांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सागर हंगे असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या कथित पत्रकाराचे नाव आहे. याप्रकरणी फ्रीझल फुड प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे संचालक हर्षल संदीप धोक्रट (वय २४, रा. आंबेगाव बुद्रुक) यांनी फुरसुंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी



दिलेल्या माहितीनुसार, हर्षल धोक्रट हे इंद्रायणी ब्रँडने तेल विक्री करतात.

हर्षल धोक्रट यांच्या उरळी देवाची (ता. हवेली) येथे इंद्रायणी ब्रँडचे खाद्यतेल तयार केले जाते. येथील गोडाऊनमध्ये २५ फेब्रुवारी रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास तीन इसम अचानक घुसले. त्यापैकी दोघांनी कंपनीत थेट व्हिडीओ शूटिंग सुरू केले. कंपनी अस्वच्छ आहे, पॅकिंगसाठी वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकची जाडी कमी आहे, अशी तक्रार असल्याचे सांगत त्यांनी स्वतः ला पोलिस कॉन्स्टेबल ननवरे आणि पत्रकार असल्याचे सांगितले.

यानंतर कंपनीचे इंद्रायणी ब्रँडचे स्टिकर, शिक्का व तेलाचा डबा ताब्यात घेतला. आणि धोक्रट व त्यांच्या सहकाऱ्याला पोलीस ठाण्यात बोलावण्यात आले. पोलीस निरीक्षक अनुपस्थित असल्याचे सांगत जवळपास एक तास थांबवण्यात आले. याचवेळी दोन कथित पत्रकारांनी १० लाख रुपये द्या, नाहीतर कंपनी बंद पाडू; सोशल मीडियावर बदनामी करून व्यवसाय उद्ध्वस्त करू, अशी थेट धमकी दिली आहे.

दुसऱ्या दिवशी कात्रज-कोंढवा रोडवरील एका हॉटेलमध्ये पुन्हा भेट घेण्यात आली. तेथे मोबाईलच्या कॅलक्युलेटरवर १० लाख रुपये टाईप करून एवढी रक्कम द्यावी लागेल असा दबाव टाकण्यात आला. सेटलमेंट नाही केली तर एफडीए कडे तक्रार जाईल, बातमी पेपर आणि न्यूज चॅनेलवर लावू, असा इशाराही कथित पत्रकारांकडून धोक्रट यांना देण्यात आला.

दरम्यान, संबंधितांनी वारंवार फोन व व्हॉट्सअॅप कॉल करून पैशांबाबत चौकशी केली. पैसे नाही दिले तर त्रास होईल, अशी उघड धमकी दिली. यावेळी धोक्रट यांनी स्पष्ट केले की, त्यांच्या कंपनीकडे महाराष्ट्र शासनाचा वैध खाद्य परवाना असून सर्व काम काज नियमानुसार चालते. कोणतेही गैरप्रकार नसल्याचा दावा करत त्यांनी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची भेट घेत संपूर्ण प्रकाराची माहिती दिली आहे.

या घटनेमुळे व्यावसायिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून पत्रकारिता की खंडणी? असा सवाल उपस्थित होत आहे. पोलिसांनी या गंभीर आरोपांची सखोल चौकशी करून सत्य बाहेर आणावे, अशी मागणी होत आहे.

# आजपासून आर्थिक नियोजन बदलण्याची शक्यता; सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनात बदल

**मुंबई, ता. २८ :** आज १ मार्च २०२६ पासून सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनात मोठे बदल होणार आहेत. नवीन महिन्याच्या सुरुवातीलाच गॅस सिलिंडरचे दर, रेल्वेचे नियम, बँकिंग आणि डिजिटल पेमेंट यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांत नवीन बदल होतील. तुम्ही वेळेत या बदलांची माहिती घेतली नाही तर, तुमच्या बजेटवर त्याचा मोठा परिणाम होऊ शकतो. प्रवास, स्वयंपाकघर आणि मोबाईल वापराशी संबंधित या नियमांमुळे तुमची जीवनशैली आणि आर्थिक नियोजन बदलण्याची शक्यता आहे.

एलपीजी गॅस आणि सीएनजी - पीएनजी दरांमध्ये होणार बदल- दर महिन्याच्या १ तारखेला पेट्रोलियम कँपन्या एलपीजी सिलिंडरचे नवीन दर जाहीर करतात. यानुसार १ मार्च रोजी घरगुती आणि व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या किमतींमध्ये चढ-उतार होण्याची दाट शक्यता आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील कच्च्या तेलाच्या किमतींनुसार हे दर ठरवले जातील. नैसर्गिक वायूच्या किमती वाढल्या तर, गृहिणींचे स्वयंपाकघरातील बजेट कोलमडू शकते आणि वाहनधारकांनाही जास्तीचा फटका सोसावा लागू शकतो.

भारतीय रेल्वेने प्रवाशांसाठी एक मोठा निर्णय घेतला आहे. १ मार्चपासून जुने यूटीएस अॅप बंद होऊन त्याऐवजी रेलवन हे नवीन अॅप सुरू होणार आहे. जनरल तिकीट, प्लॅटफॉर्म तिकीट आणि लोकल प्रवासासाठी आता याच पचा वापर करावा लागेल. प्रवाशांनी स्थानकावरील गर्दी टाळण्यासाठी आणि दंड वाचवण्यासाठी हे नवीन अॅप त्वरित डाऊनलोड करून त्यावर नोंदणी करणे आवश्यक आहे. यामुळे तिकीट काढण्याची प्रक्रिया अधिक सुरक्षित आणि वेगवान होण्यास मदत होईल.

डिजिटल फसवणूक आणि सायबर गुन्हे रोखण्यासाठी दूरसंचार विभागाने नवीन नियम लागू केले आहेत. १ मार्चपासून व्हॉट्सप आणि टेलिग्राम सारख्या मेसेजिंग प्सना सक्रिय सिम कार्डशी लिंक करणे अनिवार्य असेल. याला सिम बाइंडिंग असे म्हटले जाते. तुमचे खाते वैध मोबाईल नंबरशी जोडलेले नसेल तर, ते ब्लॉक केले जाऊ शकते. तसेच मल्टी-डिव्हाइस लॉगिनसाठी आता अतिरिक्त व्हेरिफिकेशन प्रक्रिया पार पाडावी लागेल, ज्यामुळे तुमची डिजिटल सुरक्षितता वाढणार आहे.

### बँकिंग आणि युपीआय व्यवहारांचे नवीन नियम

बँकिंग क्षेत्रातही १ मार्चपासून महत्त्वाचे बदल दिसून येतील. अनेक बँका त्यांच्या किमान शिल्लक नियमांमध्ये सुधारणा करण्याची शक्यता आहे, ज्यामुळे दंड वाढू शकतो. तसेच, यूपीआय व्यवहारांसाठी सुरक्षिततेचा अतिरिक्त स्तर जोडला जाईल, ज्यामध्ये ओटीपी व्हेरिफिकेशन किंवा ट्रान्झॅक्शन लिमिटमध्ये बदल केले जाऊ शकतात. याशिवाय, क्रेडिट कार्डचे रिवॉर्ड पॉईंट्स आणि चार्जेसमध्येही बदल होण्याची शक्यता असल्याने खातेदारांनी आपल्या बँकेच्या सूचनांकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

# महसूल विभागातील प्रलंबित खटले तीन महिन्यांत निकाली काढा : मंत्री बावनकुळे

**पुणे, ता. २८ :** राज्यात यापुढे महसूल विभागात प्रलंबित खटले तीन महिन्यांत निकाली काढण्याच्या प्रशासनाला सूचना देण्यात आल्या आहेत. तर महसूलमंत्री स्तरावरील सुरु असलेल्या ६ हजार खटल्यांपैकी सुमारे २ हजार प्रकरणांवर सुनावणी घेऊन निर्णय देण्यात आले आहेत. त्यासंदर्भात १ हजार २०० आदेश पारित करण्यात आले आहेत. येत्या काळात महसूलमंत्री कार्यालयाकडील सर्व प्रलंबित खटले निकाली काढण्याचे नियोजन करण्यात येत आहे, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

मराठा उद्योजक संघटनेच्या वतीने सिंचननगर येथे आयोजित इंटरनॅशनल बिझनेस एक्स्पोच्या उद्घाटनप्रसंगी आयोजित प्रकट मुलाखतीत ते बोलत होते. गायक अवधूत गुप्ते यांनी ही मुलाखत घेतली. यावेळी केंद्रीय



विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, खासदार श्रीरंग बारणे, माजी खासदार रवींद्र गायकवाड, महापौर मंजुषा नागपुरे, स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले, मराठा उद्योजक संघटनेचे अध्यक्ष विक्रम गायकवाड, अंकुश आसबे, अरुण निम्हण उपस्थित होते.

ते म्हणाले, राज्यात २०१२-१३ पासून महसूल विभागाकडे सुमारे १३ हजार खटले प्रलंबित होते. अधिकारांचे वर्गीकरण करून त्यापैकी महसूल राज्यमंत्री आणि महसूल विभागाचे प्रधान सचिवांकडे खटले वर्ग करण्यात आले. राज्यातील नागरिकांना गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिम ुख प्रशासनावर आधारित सेवा देऊन त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्यावर महसूल विभागाचा प्रयत्न आहे, त्यादृष्टीने विभागाने महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत, महसूल विभागाच्या सेवा गतिमान, पारदर्शक व लोकाभिमुख करण्याकरिता नागरिकांनी सहकार्य करावे.

यापुढे कामकाजामध्ये दिरंगाई करून नागरिकांना मनस्ताप देणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल. येत्या काळात राज्यातील नागरिकांना व्हर्टिकल प्रॉपर्टी कार्ड, तसेच प्रत्येक क्षेत्रनिहाय रेडीरेकनर दर निश्चित करुन देण्याचा निर्णय विचाराधीन आहे. तसेच, एक जिल्हा-एक नोंदणीच्या धर्तीवर एक राज्य-एक नोंदणी करण्यात येणार आहे. याकरिता अत्याधुनिक ६० कार्यालये उभारण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

# लोणी काळभोर येथील हर्षदा काळभोरची खेलो इंडियासाठी निवड

**लोणी काळभोर, ता. २७ :** लोणी काळभोरच्या मातीतून उगवलेली आणखी एक क्रीडातारा आता देशपातळीवर झळकणार आहे. युवा फुटबॉलपटू हर्षदा संदीप काळभोर हिची प्रतिष्ठेच्या खेलो इंडिया फुटबॉल स्पर्धेसाठी निवड झाली असून परिसरात तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रम यांच्या जोरावर हर्षदाने हे यश संपादन केले आहे.

शेतकरी कुटुंबातील संगीता आणि संदीप काळभोर यांची कन्या असलेल्या हर्षदाचे प्राथमिक ते उच्च माध्यमिक शिक्षण लोणी काळभोरमध्येच झाले. पुढे तिने वाडिया महाविद्यालयात शिक्षण पूर्ण केले असून सध्या आगाशे महाविद्यालयात बीपीएड (बॅचलर ऑफ फिजिकल एज्युकेशन) चे शिक्षण घेत आहे.

शालेय जीवनातच हॉकी, क्रिकेट, फुटबॉल आणि वुशू अशा विविध क्रीडा प्रकारांत सहभाग घेत तिने अनेक विजेतेपदे पटकावली. फुटबॉलमध्ये गोलकिपर आणि डिफेंडर म्हणून तिने आपली वेगळी छाप निर्माण केली. आंतरशालेय व जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत ती अनेक वर्षे शालेय फुटबॉल संघाची कर्णधार राहिली.

महाविद्यालयीन स्तरावरही तिची कामगिरी तितकीच दैदिप्यमान राहिली. विद्यापीठीय स्पर्धांतील उत्कृष्ट प्रदर्शनामुळे तिची निवड सावित्रीबाई फुले



पुणे विद्यापीठाच्या संघात झाली. मध्यप्रदेशातील रेवा येथे ७ ते १६ फेब्रुवारीदरम्यान झालेल्या पश्चिम विभागीय स्पर्धेत देशभरातील ५५ विद्यापीठ संघ सहभागी झाले होते. अत्यंत चुरशीच्या लढतीत पुणे विद्यापीठाच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश मिळवले. यानंतर २० ते २५ फेब्रुवारीदरम्यान अन्नामलाई विद्यापीठ येथे झालेल्या अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेत संघाने तृतीय क्रमांक मिळवला. या भक्कम कामगिरीच्या जोरावर हर्षदाची खेलो इंडियासाठी निवड निश्चित झाली.

विशेष म्हणजे २०२५ साली भारतीय फुटबॉल महिला संघात गोलकिपर म्हणून तिची आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली होती. तसेच भारतीय अंध फुटबॉल महासंघाच्या भारतीय महिला संघातही गोलकिपर म्हणून तिची निवड होऊन तिला जागतिक स्तरावर देशाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली होती.

महाराष्ट्रातून खेलो इंडियासाठी मुला-मुलींची प्रथमच निवड झाल्याने हा ऐतिहासिक क्षण मानला जात आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या क्रीडा क्रीडा इतिहासातही हा सुवर्णअध्याय ठरला आहे. हर्षदाच्या या उज्ज्वल यशामुळे लोणी काळभोर परिसरात आनंदाचे वातावरण पसरले असून सर्व स्तरांतून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. लोणी काळभोरची ही लेक आता खेलो इंडियाच्या मैदानावर देशासाठी झुंजार खेळी करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## संक्षिप्त



### महाराष्ट्र शिखर बँक घोटाळा प्रकरणी अजित पवारांसह ७० जणांना क्लीन चिट

**मुंबई, ता. २३ :** शिखर बँक घोटाळ्याप्रकरणी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, दिवंगत अजित पवारांसह ७० जणांना क्लीन चिट मिळाली आहे. याप्रकरणी नव्याने तपास करत आर्थिक गुन्हे शाखेने ३५ पानी सीसमरी अहवाल (क्लोजर रिपोर्ट) विशेष न्यायालयात सादर केला. अतिरिक्त न्यायाधीश महेश जाधव यांनी हा अहवाल आज स्वीकारला. राज्य सहकारी बँकेने २००५ ते २०१० या कालावधीत मोठ्या प्रमाणात सहकारी साखर कारखाने, सहकारी सूत गिरण्या, कारखाने आणि इतर कंपन्यांना कर्ज दिले होते. ही सर्व कर्ज बुडित निघाली होती. बँकेचे तत्कालीन संचालक असलेल्या अजित पवारांसह ७० जणांविरुद्ध आरोपपत्र दाखल करण्यात आले होते. २५ हजार कोटी रुपयांच्या शिखर बँक घोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर आर्थिक गुन्हे शाखेने क्लोजर रिपोर्ट दाखल केला होता. त्यानंतर ईओडब्ल्यूने नव्याने तपास करायचा आहे, असा अर्ज न्यायालयात केला. याप्रकरणी ईओडब्ल्यूने पुन्हा तपास केला. या तपासात काहीही निष्पन्न झालेले नाही. त्यामुळे तपास बंद अहवाल सादर केला. सत्र न्यायालयाने हा अहवाल स्वीकारला.

### एकतर्फी प्रेमाच्या जाचाला कंटाळून दाम्पत्याची आत्महत्या


**सोलापूर, ता. २८ :** संपूर्ण शहराला हादरवून सोडणाऱ्या पती-पत्नीच्या आत्महत्येप्रकरणी धक्कादायक कारण समोर आले आहे. एकतर्फी प्रेमातून होत असलेल्या सातत्यपूर्ण त्रासाला कंटाळून दाम्पत्याने विष प्राशन करून जीवन संपवल्याची माहिती तपासात उघड झाली आहे. सोलापूर शहरातील सोमनाथ धानोप्पा पाटील आणि श्रीदेवी सोमनाथ पाटील हे दाम्पत्य किराणा व्यवसाय करून संसाराचा गाडा हाकत होते. दोन लहान मुलांसह त्यांचे आयुष्य सुरळीत सुरू होते. मात्र गेल्या काही दिवसांपासून एका व्यक्तीकडून होत असलेल्या एकतर्फी प्रेमाच्या जाचा मुळे कुटुंब मानसिक तणावाखाली असल्याचे समोर आले आहे. शुक्रवारी त्यांच्या राहत्या घरी दोघांनीही विष प्राशन केले. काही वेळातच प्रकृती खालावल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. पोलिसांनी या प्रकरणी मुख्य संशयिताला अटक केली असून आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मोबाईल कॉल रेकॉर्ड, संदेश आणि इतर पुराव्यांच्या आधारे तपास अधिक तीव्र करण्यात आला आहे.

# मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर सरपंचांना प्रशासक नेमण्याचा निर्णय रद्द

## निवडणुका तातडीने घेण्याचे उच्च न्यायालयाचे निर्देश

**मुंबई, ता. २८ :** राज्यातील मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींच्या कारभाराबाबत उच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. मुदत संपल्यानंतर त्या-त्या ग्रामपंचायतींच्या विद्यमान सरपंचांना प्रशासक म्हणून नेमण्याचा राज्य सरकारचा निर्णय न्यायालयाने फेटाळून लावत ग्रामपंचायत निवडणुका तातडीने घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेला गती मिळण्याची शक्यता आहे.

राज्य सरकारने २८ फेब्रुवारीपर्यंत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींसाठी विशेष निर्णय घेत, संबंधित ग्रामपंचायतींच्या मुदत संपलेल्या सरपंचांनाच प्रशासक म्हणून कामकाज चालविण्याची परवानगी देण्याचा आदेश काढला होता. निवडणुका वेळेत होऊ शकल्या नसल्याने कारभारात खंड पडू नये, या कारणास्तव हा निर्णय घेतल्याचे सांगितले जात होते.



मात्र या निर्णयाला न्यायालयात आव्हान देण्यात आले. यावर सुनावणी करताना उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, लोकशाही व्यवस्थेत निवडून आलेल्या प्रतिनिधींचा कार्यकाळ संपल्यानंतर त्यांनाच पुन्हा प्रशासकीय अधिकार देणे योग्य ठरत नाही. निवडणुका वेळेत घेणे ही राज्य यंत्रणेची जबाबदारी आहे. मुदत संपल्यानंतर प्रशासक नेमण्याची आवश्यकता भासल्यास तो स्वतंत्र आणि कायदेशीर चौकटीत असावा, असे न्यायालयाने नमूद केले.

न्यायालयाने राज्य निवडणूक आयोग आणि संबंधित प्रशासनाला निवडणूक प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश दिले. ग्रामपंचायती हा ग्रामीण प्रशासनाचा कणा असून स्थानिक पातळीवरील विकासकामे, निधीवाटप, पाणीपुरवठा, स्वच्छता, ग्रामविकास योजना यांसारख्या महत्त्वाच्या बाबींसाठी सक्षम आणि लोकनियुक्त प्रतिनिधींची आवश्यकता असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. या निर्णयामुळे राज्यातील अनेक ग्रामपंचायतींमध्ये लवकरच निवडणुकीची रणधुमाळी सुरू होण्याची शक्यता आहे. सध्या ज्या ग्रामपंचायतींचा कार्यकाळ संपला आहे किंवा लवकरच संपणार आहे, त्या सर्व ठिकाणी निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्याबाबत राज्य निवडणूक आयोगावर दबाव वाढणार आहे.

दरम्यान, सरकारकडून या निर्णयाविरोधात पुढील कायदेशीर पावले उचलली जाणार का, याकडेही लक्ष लागले आहे. मात्र उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे ग्रामपंचायत पातळीवरील लोकशाही प्रक्रियेला बळ मिळाल्याचे मत कायदे तज्ज्ञांकडून व्यक्त केले जात आहे.

### बँकेचा बनाव करून ट्रॅक्टर लंपास

**शिक्रापूर, ता. २८ :** विठ्ठलवाडी (ता. शिरूर) येथील सहदेव पोपट भरणे (वय ३०) यांनी बँकेकडून कर्ज घेऊन सहामाही हप्त्यावर ट्रॅक्टर खरेदी केला होता. २१जानेवारी रोजी पहिल्या हप्त्याच्या दिवशी एक अज्ञात इसम त्यांच्या घरी आला. त्याने स्वतः ला बँकेचा कर्मचारी असल्याचे सांगत आत्ताच हप्ता भरा, नाहीतर ट्रॅक्टर ताब्यात घेतो, अशी धमकी दिली. भरणे यांनी विश्वास ठेवताच त्या इसमने ट्रॅक्टर घेऊन पलायन केले.


दुसऱ्या दिवशी भरणे बँकेत चौकशीसाठी गेले असता संबंधित व्यक्ती बँकेशी कोणत्याही प्रकारे संबंधित नसल्याचे स्पष्ट झाले. वारंवार चौकशी केल्यानंतर १७ फेब्रुवारी रोजी बँकेनेही ट्रॅक्टर ताब्यात घेतलेला नसल्याचे लेखी सांगितले. त्यानंतर फसवणूक झाल्याचे लक्षात येताच भरणे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# पुण्यातील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी रस्ते अतिक्रमण मुक्त करा : आमदार राहुल कुल

राहुलकुमार अवचट

यवत, ता. २८ : पुणे शहर आणि परिसरातील वाहतुकीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून, शहराला जोडणारे सर्व मुख्य रस्ते तातडीने अतिक्रमण मुक्त करावेत आणि अनधिकृत फेरीवाल्यांवर कडक कारवाई करावी, अशी आग्रही मागणी आमदार राहुल कुल यांनी आज विधानसभेत केली. पुण्याच्या वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून सुरू असलेले रिंग रोड आणि एलिव्हेटेड कॉरिडॉरचे प्रकल्प एका निश्चित कालमर्यादित पूर्ण करण्याची गरजही त्यांनी यावेळी अधोरेखित केली.

विधानसभेत लक्षवेधी सूचनेद्वारे पुण्यातील वाहतूक व्यवस्थेवर चर्चा करताना आमदार कुल



बोलत होते. यावेळी आमदार कुल यांनी पुणे शहराच्या भविष्यातील दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या प्रकल्पांकडे सरकारचे लक्ष वेधले.

पुणे शहरात प्रवेश करणारे आणि शहराला जोडणारे सर्व प्रमुख रस्ते सध्या अतिक्रमणांच्या विळख्यात आहेत. विशेषतः अनधिकृत फेरीवाल्यांमुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत असून, पादचारी आणि वाहनचालकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. हे रस्ते तातडीने मोकळे करण्यासाठी संबंधित महानगरपालिका आणि पोलीस प्रशासनाला कडक आदेश देण्याची मागणी त्यांनी केली.

'एमएसआरडीसी' मार्फत राबवण्यात येणारा आउटर रिंग रोड, 'पीएमआरडीए'चा इनर रिंग रोड आणि पुणे-नगर तसेच पुणे-सोलापूर महामार्गावरील प्रस्तावित एलिव्हेटेड कॉरिडॉर हे प्रकल्प पुण्यासाठी जीवनदायी ठरणार आहेत. हे प्रकल्प केवळ कागदावर किंवा निविदा प्रक्रियेत न रेंगाळता, ते वेळेत पूर्ण होण्यासाठी विशेष यंत्रणाउभी करावी, असे आमदार राहुल कुल यांनी नमूद केले. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार फेरीवाला धोरण राबवून अधिकृत झोन निश्चित करावेत, जेणेकरून वाहतुकीला अडथळा निर्माण होणार नाही, या मुद्द्यावरही त्यांनी भर दिला. आमदार राहुल कुल यांच्या प्रश्नावर उत्तर देताना संबंधित मंत्र्यांनी स्पष्ट केले की, पुण्याच्या रिंग रोडच्या कामांना राज्य सरकारने प्राधान्य दिले आहे. तसेच, वाहतुकीला अडथळा ठरणारी अतिक्रमणे काढण्यासाठी आणि अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करण्यासाठी पुणे महानगरपालिका आणि ट्रॉफिक पोलिसांना विशेष सूचना दिल्या जातील, असे आश्वासनही सरकारतर्फेदेण्यात आले.

पुणेकरांचा रोजचा प्रवास सुखकर व्हावा आणि वेळेची बचत व्हावी, यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा करत आहोत, असा विश्वास आमदार राहुल कुल यांनी यावेळी व्यक्त केला.

### नोंदणी व मुद्रांक विभागातील गट–ड संवर्गातील अंतिम निवड यादी जाहीर

**मुंबई, ता. २८ :** नोंदणी व मुद्रांक विभागात शिपाई गट-ड संवर्गात २८४ उमेदवारांची अंतिम निवड यादी, प्रतिक्षा यादी, निवडीसाठी नकार दिलेल्या उमेदवारांची यादी, अपात्र उमेदवारांची यादी तसेच कागदपत्र पडताळणीसाठी गैरहजर उमेदवारांची यादी नोंदणी व मुद्रांक विभागाच्या www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर २७ फेबुवारी २०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

नोंदणी व मुद्रांक विभागात शिपाई गट-ड संवर्गात अंतिम निवड यादीमध्ये निवड झालेल्या उमेदवारांचे समुपदेशन करुन नियुक्ती देण्याचे निश्चित केलेले असून, उमेदवारांनी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे बहुउद्देशिय सभागृह, पाचवा मजला, पुणे येथे सोमवार,

नोंदणी व मुद्रांक विभाग

२ मार्च २०२६ रोजी सकाळी आठ वाजता हजर रहावे. याबाबत अधिक माहिती नोंदणी व मुद्रांक विभागाच्या वरील नमूद संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे, असे पुणे येथील नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक रवींद्र बिनवडे यांनी प्रसिद्ध पत्रकाद्वारे कळविले आहे.

# कुंजीरवाडी येथील यात्रेत तरुणावर कोयत्याने हल्ला; एक जण जखमी

**लोणी काळभोर, ता. २८ :** पिरसाहेबांच्या उरुस यात्रेत भर चौकात कोयता काढून तरुणावर हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही घटना कुंजीरवाडी (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीत बुधवारी (ता. २५) रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या हल्ल्यात एकजण जखमी झाला आहे तर लोणी काळभोर पोलिसांनी तत्काळ दोन जणांना ताब्यात घेतले आहे. जुन्या वादाच्या रागातून हा हल्ला करण्यात आल्याने गावात एकच खळबळ उडाली आहे.

प्रविण राजाभाऊ घोडके (वय २१ रा. मगरवस्ती म्हतोबाची आंळदी रोड, म्हतोबाची आंळदी ता. हवेली जि. पुणे), ऋषीकेश नाना लोंढे (रा. १२ फाटा चौकी, जयगणेश पार्क कुंजीरवाडी ता. हवेली जि. पुण) व




त्यांचे इतर दोन मित्रांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी गौरव सुदर्शन खलसे (वय २४, माळवाडी, कुंजीरवाडी, ता. हवेली) याने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गौरव खलसे हा त्याचे मित्र आदेश बरडे याच्यासोबत यात्रेत गेला होता. रात्री ९ वाजण्याच्या सुमारास दोघे घरी परतत असताना बाजार मैदान परिसरात काही तरुणांनी त्यांचा रस्ता अडवला. पूर्वी झालेल्या वादाचा राग मनात धरून प्रविण घोडके याने कमरेला लपवलेला लोखंडी कोयता बाहेर काढत थेट गौरववर झडप घातली. कोयत्याच्या पाठीमागील बोथट बाजूने उजव्या हातावर आणि पाठीवर वार करत गौरव खलसेला जखमी करण्यात आले. त्याच वेळी ऋषीकेश नाना लोंढे व इतर दोन साथीदारांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करत शिवीगाळ आणि दमदाटी केली. अचानक झालेल्या या हल्ल्याने यात्रेतील वातावरण तणावपूर्ण झाले.

गौरव आणि त्याचा मित्र कसाबसा सुटून घरी पळाले. मात्र, जुन्या कॅनॉल पुलावर नागरिकांची गर्दी जमल्याचे पाहून ते पुन्हा घटनास्थळी गेले. हातात कोयता घेऊन फिरणाऱ्या आरोपींना पाहून संतप्त नागरिकांनी त्यांना जाब विचारला. उलट आरोपींनी लोकांनाही शिवीगाळ केल्याने काहींनी त्यांना चोप दिला, अशी माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली.

दरम्यान, नागरिकांनी पोलिसांना फोन करून माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत प्रविण घोडके आणि ऋषीकेश लोंढे यांना ताब्यात घेतले, तर त्यांचे दोन साथीदार अंधाराचा फायदा घेत पसार झाले. या प्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फरार आरोपींचा शोध सुरू असून पोलिसांकडून पुढील तपास करण्यात येत आहे.

# लोणी काळभोरमध्ये गुटख्याचा काळाबाजार उघड; ४७ हजारांचा साठा जप्त तर दोघे जेरबंद

**लोणी काळभोर, ता. २८ :** लोणी काळभोर पोलीस आणि अन्न व औषध प्रशासन यांच्या संयुक्त पथकाने लोणी काळभोर (ता. हवेली) गावातील पवार पान शॉपवर शुक्रवारी (ता.२७) दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास धाड टाकली. या छाप्यात दोन जणांना अटक करण्यात आली असून तब्बल ४७ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा, पानमसाला व तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला आहे.

गणेश बाळू मंडलकर (वय ३०) व निलेश वसंत पवार (वय ४६, दोन्ही रा. लोणी काळभोर, ता. हवेली) असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी अन्न सुरक्षा अधिकारी अस्मिता गणपत गायकवाड यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अन्न सुरक्षा आयुक्तांच्या १६ जुलै २०२५ च्या अधिसूचनेनुसार राज्यात गुटखा, पानमसाला, सुगंधित तंबाखू व फ्लेव्हर्ड सुपारीच्या उत्पादन, साठवण, विक्री व वाहतुकीस एक वर्षासाठी बंदी घालण्यात आली आहे. या आदेशाचे उल्लंघन करून मे. पवार पान शॉप येथे येथे बेकायदेशीर प्रतिबंधित अन्नपदार्थांचा साठा असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली होती. मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने संयुक्त पथकाने छापा टाकला. तपासणीदरम्यान महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेले विविध ब्रँडचे गुटखा, पानमसाला, जर्दा, फ्लेव्हर्ड तंबाखू व सुपारी असा एकूण ४७ हजार २९७ रुपयांचा साठा आढळून आला.

याप्रकरणी गणेशमंडलकर व निलेश वसंत पवार यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम१२३, २२३, २७४, २७५ तसेच अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ अंतर्गत विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. तर छाप्यात जप्त केलेला मुद्देमाल ताब्यात घेऊन अन्न व औषध प्रशासनाच्या मोशी येथील गोडाऊनमध्ये सुरक्षित ठेवण्यात आला आहे. तसेच संबंधित पेढी पुढील आदेशापर्यंत सील करण्यात आली आहे.

ही कारवाई पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त अनुराधा उदमले यांच्या मार्गदर्शनाखाली लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, पोलीस हवालदार राम हरी वणवे, पोलीस अंमलदार योगेश पाटील, व अन्न सुरक्षा विभागाच्या अन्न सुरक्षा अधिकारी अस्मिता गायकवाड, बीआर शिंदे, सुप्रिया जगताप यांनी संयुक्तरीत्या केली आहे.

# महिलेची छेडछाड करणारा सराईत गुन्हेगार अस्लम शेख गजाआड

**लोणी काळभोर, ता. २८ :** लोणी काळभोर परिसरात दादागिरीचा आणखी एक प्रकार समोर आला आहे. मुलीबरोबर झालेल्या किरकोळ वादाचा राग मनात धरून एका ४६ वर्षीय महिलेला शिवीगाळ, मारहाण आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना शुक्रवारी (ता. २७) दुपारी सुमारे २ वाजता घडली. घटनेनंतर लोणी काळभोर पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपीला अटक केली.

अस्लम अन्वर शेख (वय २५, रा. जयहिंद नगर वस्ती, कदम वाकवस्ती, ता. हवेली, जि. पुणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. या प्रकरणी संबंधित महिलेने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला लोणी काळभोर परिसरात कुटुंबासह




राहतात. आरोपी अस्लम शेख हा हमालीचे काम करतो. फिर्यादी आणि आरोपी हे एकमेकांच्या ओळखीचे आहेत. फिर्यादी यांच्या मुलगी आणि आरोपी यांच्यात काही दिवसांपूर्वी वाद झाला होता.

शुक्रवारी दुपारी फिर्यादी या आपल्या दोन मुलींसह घरी असताना, मुलीसोबत झालेल्या वादाचा राग काढण्यासाठी अस्लम शेख त्यांच्या घराजवळ आला. त्याने फिर्यादी महिलेला अश्लील व अपमानास्पद शिवीगाळ केली, हाताने मारहाण केली आणि जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिली. तसेच तिच्या स्त्रीमनाला लज्जा वाटेल असे अश्लील वक्तव्य केल्याचा आरोप आहे.

या घटनेनंतर महिलेने तात्काळ पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदवली. त्यानुसार अस्लम शेख याच्याविरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम ७९, ११५(२), ३५१(२)(३) आणि ३५२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस ठाण्याच्या नोंदीप्रमाणे आरोपी हा सराईत गुन्हेगार असून यापूर्वीही त्याच्याविरुद्ध गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनी कठोर कारवाईची मागणी केली आहे.

# इंदापूर नगरपरिषदेचा २०२६ –२७ चा अर्थसंकल्प एकमताने मंजूर

आदित्य बोराटे

इंदापूर, ता. २८ : इंदापूर नगरपरिषदेचा सन २०२६ -२७ या आर्थिक वर्षाचा सुधारित व प्रस्तावित अर्थसंकल्प सर्वसाधारण सभेत एकमताने मंजूर करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात झालेल्या बैठकीस नगराध्यक्ष भरत शहा अध्यक्षस्थानी होते. उपनगराध्यक्ष शैलेश पवार उर्फ बाळासाहेब ढवळे, विरोधी पक्षनेते अनिल पवार, मुख्याधिकारी रमेश ढगे, सर्व नगरसेवक तसेच अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

नगराध्यक्ष भरत शहा यांनी अर्थसंकल्प सादर करताना शहराच्या सर्वांगीण आणि नियोजनबद्ध विकासावर भर दिला. पाणीपुरवठा सुधारणा, सांडपाणी व्यवस्थापन, स्वच्छता व आरोग्य सुविधा, रस्ते विकास, हरित उपक्रम, डिजिटल प्रशासन आणि मूलभूत पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी भरीव तरतूद करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे नागरिकांवर कोणतीही करवाढ न करता विकासकामे राबविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

मुख्याधिकारी रमेश ढगे यांनी अर्थसंकल्पातील आर्थिक बाबींचा सविस्तर आढावा मांडला. मागील आर्थिक वर्षातील शिल्लक रक्कम १ कोटी १७ लाख ५४ हजार ८६ रुपये असून, सन २०२६ -२७ साठी अंदाजित महसुली व भांडवली जमा




१७८ कोटी ४९ लाख ४५ हजार रुपये अपेक्षित आहे. तर एकूण अंदाजित खर्च १७८ कोटी ९२ लाख २६ हजार ४०० रुपये इतका प्रस्तावित करण्यात आला आहे.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत नवीन पाणीपुरवठा गटर योजना आणि विविध रस्ते प्रकल्पांना गती देण्यासाठी निधी राखीव ठेवण्यात आला आहे. महिला व बालकल्याण, दिव्यांग कल्याण, क्रीडा महोत्सव, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प, संगणकीकरण व नागरिक सुविधा केंद्राच्या बळकटीकरणासाठीही विशेष तरतूद करण्यात आली आहे.

वाढती लोकसंख्या आणि शहराचा विस्तार लक्षात घेऊन नवीन रस्ते, प्रशासकीय इमारत तसेच आवश्यक नागरी सुविधा उभारण्यासाठी आर्थिक नियोजन करण्यात आले आहे. सखोल चर्चेनंतर उपनगराध्यक्ष शैलेश पवार उर्फ बाळासाहेब ढवळे आणि विरोधी पक्षनेते अनिल पवार यांनीही सकारात्मक सूचना मांडल्या. दरम्यान, शहराच्या पारदर्शक, लोकाभिमुख आणि शाश्वत विकासासाठी हा अर्थसंकल्प दिशादर्शक ठरेल, असा विश्वास व्यक्त करत सर्व सदस्यांनी एकमताने अर्थसंकल्पास मंजुरी दिली.

# वाघोलीत मेफेड्रोन तस्कर पकडले; ५५ लाखांचा मुद्देमाल जप्त



**वाघोली, ता. २८ :** पुणे नगर रस्ता: वाघोली परिसरात पोलिसांनी मेफेड्रोन विक्रीसाठी आलेल्या दोन तस्करांना अटक केली. दोघांकडून २८ लाखांच्या मेफेड्रोनसह मोटार आणि मोबाइलचा एकूण ५५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

किशन नंदकिशोर लधड (वय-३५, रा. धानोरी), हनुमान रूपाराम चौधरी (वय-३३, रा. वडगाव मावळ) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यान्वये त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही आरोपी मागील वर्षभर शहरात सक्रिय तस्करी करत होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नगर रस्त्यावरील केसनंद भागात किशन लधडला मेफेड्रोन विक्रीसाठी पकडले गेले. तपासात वडगाव मावळमधील तस्कर हनुमान चौधरी याने त्याला मेफेड्रोन पुरविल्याचे उघडकीस आले. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने चौधरीला वडगाव मावळ परिसरात सापळा लावून पकडले.

चौधरी याच्या मोटारीत मेफेड्रोन सापडले. त्याच्याकडून २८ लाख रुपयांचे १३४ ग्रॅम मेफेड्रोन जप्त करण्यात आले. चौधरी मूळचा राजस्थानमधील आहे. त्याने राजस्थानातून मेफेड्रोन आणून शहरात विक्री केल्याची माााहिती तपासात मिळाली. चौधरीच्या मोटारीत १३४ ग्रॅम मेफेड्रोन सापडली, ज्याची किंमत अंदाजे २८ लाख रुपये आहे. चौधरी मूळचा राजस्थानचा असून तो राजस्थानहून मेफेड्रोन आणून पुणे शहरात विक्री करत होता. ही कारवाई अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, उपायुक्त सोमय मुंडे, सहायक आयुक्त नूतन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक नंदकुमार गायकवाड, पोलीस निरीक्षक पल्लवी मेहेर, सहायक निरीक्षक विजय चंदन, उपनिरीक्षक अमोल काळे, तसेच प्रदीप मोरे, शेखर शिंदे, विशाल गायकवाड, मारुती वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

# लोणी काळभोर पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक अनिल जाधव सेवेतून निवृत्त

**लोणी काळभोर, ता. २८ :** लोणी काळभोर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक अनिल सिताराम जाधव हे शनिवारी (ता. २८ फेब्रुवारी) तब्बल ३५ वर्षांच्या प्रदीर्घ व उल्लेखनीय सेवेनंतर सेवानिवृत्त झाले आहेत. गुन्हे उघडकीस आणण्यातली त्यांची तडफ, तपासातील काटेकोरपणा आणि सहकाऱ्यांशी जपलेले स्नेहबंध यामुळे पोलीस दलात त्यांच्या कामाची उणीव निश्चितच भासणार आहे.

सोलापूर येथे सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेल्या अनिल जाधव यांनी बारावीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर पोलीस भरतीची तयारी सुरू केली. त्यानंतर ते सोलापूर शहर पोलीस दलात पोलीस अंमलदार म्हणून दाखल झाले. सेवाकाळात त्यांनी जेलरोड, फौजदारी चावडी, गुन्हे शाखा तसेच जोन्स स्कॉडमध्ये काम करताना अनेक धाडसी कारवाया केल्या. सन २००८ ते २०१० या कालावधीत सोलापूर शहरात घरफोडी व जबरी चोरीचे शंभर ते दीडशे गुन्हे उघडकीस आणण्यात त्यांची महत्त्वाची भूमिका होती. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांना महाराष्ट्र पोलीस दलाकडून उत्कृष्ट कामगिरी, सातत्यपूर्ण सेवा आणि क्लिष्ट गुन्ह्यांची उकल केल्याप्रकरणी पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.



पुढे २०१३ साली अनिल जाधव यांनी सेवांतर्गत परीक्षा उत्तीर्ण करून पोलीस उपनिरीक्षक पद मिळवले. सन २०२४ ते २०२६ या काळात जवळपास १८ महिने त्यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात तपास पथकाचे प्रमुख म्हणून काम केले. या काळात खून, खुनाचा प्रयत्न, दरोडा, घरफोडी, जबरी चोरी, महिलांविषयीचे गुन्हे तसेच अवैध धंद्यांवर कारवाई करून ५० हून अधिक गुन्ह्यांचा छडा त्यांनी लावला. संपूर्ण सेवाकाळात ३०० ते ३५० पेक्षा अधिक गुन्हे उघडकीस आणण्याची उल्लेखनीय कामगिरी त्यांच्या नावावर आहे.

दरम्यान, लोणी काळभोर परिसरातील प्रेमप्रकरणातून घडलेल्या खुनाचा गुंतागुंतीचा तपास त्यांनी कौशल्याने उलगडला. तसेच सोलापूर येथे कर्तव्य बजावत असताना घडलेल्या दुहेरी हत्याकांडातील आरोपींना अटक करण्यातही त्यांनी महत्त्वाची भूमिका निभावली. नागरिकांवर जीवघेणे हल्ले करणाऱ्या आणि पोलिसांना चकवा देणाऱ्या एका सोनसाखळी चोरट्याला त्यांनी अचूक वर्णनावरून ओळख पटवून बेड्या ठोकल्या. त्या आरोपीवर पोलिसांनी ५० हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते.

कर्तव्य बजावत असतानाच अनिल जाधव यांचा विवाह पोलीस दलातील सहकाऱ्याशी झाला. त्यांच्या पत्नी अनिता अशोक चव्हाण या पोलीस दलात सहायक फौजदार म्हणून कार्यरत आहेत. कुटुंबात मोठी मुलगी श्वेता बँक ऑफ बडोदामध्ये व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहे, तर लहान मुलगी निकिता उच्च शिक्षण घेत आहे. मुलगा रितेश स्पर्धा परीक्षेची तयारी करत आहे. तीन दशकांहून अधिक काळ पोलीस सेवेत राहून गुन्हेगारीविरुद्ध लढणारे अनिल जाधव आता सेवानिवृत्त होत असले तरी त्यांच्या धाडसी कामगिरीच्या आठवणी सहकारी आणि नागरिकांच्या मनात कायम राहणार आहेत.

# आयपीएल स्पर्धा मार्चच्या शेवटच्या आठवड्यात सुरू होण्याची शक्यता

**मुंबई, ता. २८ :** आयपीएल २०२६ ची तयारी आधीच सुरू झाली आहे. अनेक संघांनी त्यांचे कॅम्पही सुरू केले आहेत. दरम्यान, मार्चच्या शेवटच्या आठवड्यात ही स्पर्धा सुरू होण्याची शक्यता असल्याचे वृत्त आहे. बीसीसीआयने अद्याप वेळापत्रक जाहीर केलेलं नसलं तरी, आता असं समोर येत आहे की स्पर्धा ठराविक वेळेनुसार दोन दिवसांनी पुडे ढकलली जाणार आहे. पहिल्या सामन्याची तारीख अद्याप निश्चित झालेली नाही.



आयपीएल २०२६ चा पहिला सामना कधी खेळवला जाईल हे बीसीसीआयने अद्याप जाहीर केलेलं नाही. पण, पूर्वी समोर आलेल्या वृत्तांनुसार पहिला सामना २६ मार्च रोजी खेळवला जाईल. पण आता समोर आलेल्या वृत्तांनुसार ही तारीख एक-दोन दिवस पुढे ढकलली जाऊ शकते. पण, बीसीसीआयने याबाबत अधिकृत माहिती दिलेली नाही.

क्रिकबझने दिलेल्या वृत्तानुसार, आयपीएल २०२६ मधील पहिला सामना २८ मार्च रोजी खेळवला जाण्याची शक्यता आहे, परंतु २९ मार्चचाही विचार केला जात आहे. २८ मार्च हा शनिवार आहे आणि २९ मार्च हा रविवार आहे, ज्यामुळे चाहत्यांचा स्पर्धेला योग्य तो प्रतिसाद देखील लाभू शकतो. संपूर्ण आयपीएल हंगामाचे वेळापत्रक बीसीसीआय मार्चच्या पहिल्या आठवड्यात जाहीर करण्याची शक्यता आहे. बीसीसीआयने २६ मार्च रोजी आयपीएल सुरू होण्याची घोषणा केली नसली तरी, अंतर्गत चर्चा सुरू होती. तसेच, जेव्हा लिलाव झाला त्यावेळी संघांना हीच तारीख सांगण्यात आली होती. सुरुवातीला ३१ मे ही अंतिम फेरीसाठी निश्चित करण्यात आली होती, पण आता आलेल्या माहितीनुसार स्पर्धेची तारीख पुढे ढकलली जाऊ शकते. पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ आणि आसाममध्ये लवकरच निवडणुका होणार आहेत. निवडणुकांसोबत आयपीएल स्पर्धा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे निवडणुकीच्या तारखांशी टक्कर होऊ नये म्हणून आयपीएलचे स्पर्धेच्या तारखा अद्याप जाहीर करण्यात आलेल्या नाहीत. निवडणूक आयोगाने राज्य निवडणुकांच्या तारखा जाहीर केल्यानंतरच आयपीएलचे वेळापत्रक जाहीर करण्याचे सुरुवातीला नियोजन होते. पण, फार विलंब होत असल्याने पुढील आठवड्यात वेळापत्रक जाहीर होण्याची शक्यता आहे.

सुरूवातीला फक्त स्पर्धेचं अर्ध वेळापत्रक जाहीर केलं जाईल, परंतु निवडणुकीची तारीख जाहीर झाल्यावर संपूर्ण कार्यक्रम जाहीर केला जाईल आणि बदल नंतर जाहीर केले जातील.

# हातवे–केतकावणे येथे पोहण्यासाठी उतरलेल्या १७ वर्षीय युवकाचा बुडून मृत्यू

**विशाल शिंदे**

भोर, ता. २८ : भोर तालुक्यातील हातवे बुद्रुक-केतकावणे परिसरातील नदीपात्रात पोहण्यासाठी उतरलेल्या वर्षीय युवकाचा पाण्याचा अंदाज न आल्याने बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली.



गजानन नामदेव केंद्रे (वय १७, सध्या रा. येवलेवाडी, मूळ गाव नागदरवाडी, जि. नांदेड) असे मृत युवकाचे नाव असून, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गजानन केंद्रे हा मित्रांसोबत हातवे-केतकावणे येथील नदीपात्र परिसरात गेला होता. त्यावेळी पोहण्यासाठी नदीत उतरला असता पाण्याची खोली व प्रवाहाचा अचूक अंदाज न आल्याने तो अचानक खोल पाण्यात गेला. काही क्षणांतच तो पाण्यात बुडाल्याने उपस्थितांमध्ये एकच गोंधळ उडाला. स्थानिक नागरिकांनी तातडीने शोध घेण्याचा प्रयत्न केला; मात्र यश न आल्याने घटनेची माहिती राजगड पोलीस स्टेशनला देण्यात आली. माहिती मिळताच राजगड पोलीस स्टेशनमार्फत हवेली आपत्ती व्यवस्थापन टीमला तात्काळ पाचारण करण्यात आले. आपत्ती व्यवस्थापन पथकाने घटनास्थळी धाव घेत नदीपात्रात शोधमोहीम सुरू केली. काही वेळाच्या अथक प्रयत्नांनंतर युवकाचा मृतदेह पाण्याबाहेर काढण्यात आला. त्यानंतर मृतदेह पुढील कार्यवाहीसाठी पोलीस प्रशासन व नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.

या रेस्क्यू मोहिमेत तानाजी भोसले, वैभव भोसले, संजय चोरघे, गणेश सपकाळ, संदीप सोलस्कर, प्रतीक महामुनी व योगेश गोपी यांनी सहभाग घेतला. कारवाईदरम्यान राजगड पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी औदुंबर नागनाथ आडवाले घटनास्थळी उपस्थित होते व त्यांनी आवश्यक समन्वय साधला.

दरम्यान, उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर नदी, ओढे व धरण परिसरात पोहण्यासाठी जाणाऱ्यांची संख्या वाढत असून, पाण्याची खोली व प्रवाहाचा अंदाज न आल्याने अशा दुर्घटना घडत आहेत. त्यामुळे नागरिकांनी नदीपात्रात उतरताना योग्य खबरदारी घ्यावी व धोकादायक ठिकाणी पोहणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

पुणे प्राईम न्यूज
http://www.puneprimenews.com

प्राईम लाईफ



## मधुमेहींनी गुलकंद का खायला हवा, वाचा

गुलाबाच्या पाकळ्यांपासून बनवलेले गुलकंद हे केवळ आपल्या जीभेच्या चवीसाठी नाही, तर आपल्या आरोग्यासाठीही तितकेच महत्त्वाचे आहे. गुलकंद हा रोज आपण खायला हवा. गुलकंद खाण्याचे आरोग्यवर्धक फायदे जाणून तुम्हीही थक्क व्हाल. गुलकंद हा कोणत्याही गुलाबापासून बनत नसून, केवळ देशी गुलाबापासूनच गुलकंद तयार करण्यात येतो. गुलकंद तयार करण्यासाठी गुलाबाच्या पाकळ्या आणि साखर या दोन गोष्टी प्रामुख्याने वापरल्या जातात. अनेक त्रासांवर गुलकंद हा रामबाण इलाज आहे. चला तर पाहुया, गुलकंद खाण्याचे आरोग्यासाठी काय फायदे होतात.

पित्ताचा त्रास उफाळून येतो अशावेळी किमान एक चमचा गुलकंद खाणे हे खूप फायदेशीर ठरते. पोटातील जळजळ अपचन यासारख्या त्रासांवर गुलकंद खाण्याचा सल्ला दिला जातो.

रक्तशुद्धीसाठी गुलकंद हा एक खात्रीशीर उपाय मानला जातो. गुलकंदाच्या सेवनामुळे रक्तशुद्धी होते त्याजोडीला त्वचेला उजाळा देखील मिळतो.

लघवीला जळजळ होण्याचे प्रमाण उन्हाळ्यात वाढते. याचबरोबर तोंडात फोड येण्याचेही प्रमाण खूप वाढते. अशावेळी गुलकंद खाण्यामुळे हे त्रास कमी होऊ शकतात.

गुलकंद आतड्यांच्या आरोग्यासाठी आवर्जून खायला हवा. ज्यांना बद्धकोष्टतेचा त्रास वारंवार होतो त्यांना डॉक्टर किमान चम चाभर गुलकंद खाण्यास सांगतात.

गुलकंदामध्ये मॅग्नेशियमचे प्रमाण जास्त असते. मॅग्नेशियम हे रक्तदाब आणि साखरेची पातळी उत्तम राखण्यासाठी मदत करतात त्यामुळे हृद्य निरोगी राहण्यास खूप मदत होते. म्हणूनच निरोगी हृद्यासाठी गुलकंद खाणे हे खूप गरजेचे आहे.

चेहऱ्यावरील मुरुम, पिंपल्स तसेच काळे डाग गुलकंदाच्या सेवनाने कमी होतात. त्याचबरोबर ब्लॅकहेडस्ची समस्याही खूप मोठ्या प्रमाणात कमी होते.

शाळेत जाणाऱ्या मुलांना नियमितपणे गुलकंद दिल्यास, त्यांची स्मरणशक्ती वाढण्यास खूप मदत होते. म्हणूनच अनेक पालक मुलांसाठी खास गुलकंद घरी बनवणे पसंत करतात.

# डोर्लेवाडीत जलजीवन योजनेचे जल अर्पण करून हस्तांतरण; ग्रामस्थांची मोठी उपस्थिती

**गोरख जाधव**

डोर्लेवाडी, ता. २८ : केंद्र शासनाच्या जल जीवन मिशन अंतर्गत डोर्लेवाडी येथे राबविण्यात आलेली नळ पाणीपुरवठा योजना पूर्ण झाल्यानंतर तिचे जल अर्पण करून ग्राम पंचायतीकडे औपचारिक हस्तांतरण करण्यात आले. जिल्हा परिषद पुणे व पंचायत समिती बारामती यांच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या वतीने हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

ग्रामपातळीवर राबविण्यात आलेल्या या योजनेमुळे गावातील प्रत्येक घरापर्यंत स्वच्छ पाणी पोहोचण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. प्रशासनाच्या वतीने जलपूजन करून योजनेचे हस्तांतर करण्यात आले.



कार्यक्रमास पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी नंदन जरांडे, पाणीपुरवठा विभागाच्या उपअभियंता अश्विनी मेश्राम, माजी सभापती अशोक नवले, माजी सभापती डॉ. प्रतिभा नेवसे, खरेदी-विक्री संघाचे संचालक ज्ञानदेव नाळे, माजी संचालक भगवान क्षीरसागर, शिवनगर विद्या प्रसारक मंडळाचे विश्वस्त डॉ. मोहन नेवसे, छत्रपती कारखान्याचे संचालक नितीन मासाळ, माजी संचालक रमेश मोरे, सरपंच सुप्रिया नाळे, उपसरपंच सुनील म्हेत्रे, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रतिमेचे पूजन करून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. प्रास्ताविकात सोमनाथ भिले यांनी योजनेची संपूर्ण माहिती दिली. गावातील घरांना देण्यात आलेली नळ जोडणी, पाण्याच्या स्रोताची उपलब्धता, जलसाठा व्यवस्थापन तसेच भविष्यातील देखभाल याबाबत त्यांनी सविस्तर माहिती मांडली.

या योजनेमुळे महिलांची पाण्यासाठीची रोजची पायपीट थांबणार असून आरोग्यदृष्ट्याही गावाला मोठा फायदा होणार असल्याचे त्यांनी नमूद केले. दरम्यान, प्राथमिक शाळा व न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी जलसंवर्धनाबाबत घोषणा देत प्रभात फेरी काढून जनजागृती केली. ज्या ठिकाणी नळ जोडण्या देण्यात आल्या, त्या ठिकाणी जाऊन मान्यवरांनी जलपूजन केले. आरोग्य सेवकांनी पाण्याची गुणवत्ता तपासणी केली. मंदिर परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

दरम्यान, शेवटी जल अर्पण करून योजनेचे हस्तांतर ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांकडे करण्यात आले. उपस्थितांनी पाणी बचतीची शपथ घेतली. सहाय्यक गटविकास अधिकारी नंदन जरांडे, निवृत्ती नेवसे व मनोज नाळे यांनी मनोगत व्यक्त करत योजनेच्या यशस्वी अंम लबजावणीसाठी ग्रामस्थांचे सहकार्य महत्त्वाचे असल्याचे सांगितले.

## कोर्टातच भिडल्या दोन महिला वकील

**पुणे, ता. २८ :** शिवाजीनगर येथील मोटार वाहन न्यायालय परिसरात दोन महिला वकिलांमध्ये झालेल्या वादातून हाणामारीची गंभीर घटना घडली आहे. या घटनेत एका वकिलाच्या डोक्याला टोकदार वस्तूने मार लागून रक्तस्राव झाल्याची माहिती समोर आली आहे. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

तक्रारदार ॲड. (४२ रा. भवानी पेठ) या गेल्या दीड वर्षांपासून मोटार वाहन न्यायालय, शिवाजीनगर येथे वकिली व्यवसाय करीत आहेत. त्यांचा आरोप आहे की, न्यायालयीन प्रकरणे जास्त प्रमाणात मिळत असल्याच्या कारणावरून दोन महिला वकिलांशी त्यांचे यापूर्वी वाद झाले होते. दरम्यान, २४ फेब्रुवारी रोजी सकाळी त्या न्यायालयात कामासाठी आल्या असता संबंधित दोन वकिलांनी त्यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. दिवसभर त्या त्यांच्या मागे फिरत आज कुणालाही काम करू देणार नाही, पैसे कमवू देणार नाही, अशी धमकी दिल्याचा आरोप आहे.

# खासगी शाळांच्या अवाढव्य शुल्कावर नियंत्रण मिळवण्यासाठी कायदा करणार : राहुल कुल

**राहुलकुमार अवचट**

यवत,ता.२८:राज्यातीलखासगी प्राथमिक व माध्यमिक शाळांकडून घेतल्या जाणाऱ्या अवाढव्य शुल्कावर नियंत्रण मिळवण्यासाठी राज्य सरकार एक सर्वसमावेशक धोरण आणि कायदा तयार करण्याच्या विचारात असल्याची महत्त्वपूर्ण माहिती सरकारने विधानसभेत दिली. दौंडचे आमदार ड .राहुल कुल यांनी उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नावर उत्तर देताना शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी ही ग्वाही दिली.

विधानसभेच्या प्रश्नोत्तराच्या तासात आमदार राहुल कुल यांनी राज्यातील शिक्षण व्यवस्थेतील महत्त्वाच्या त्रुटींकडे सभागृहाचे लक्ष वेधले. आमदार राहुल कुल यांनी प्रामुख्याने तीन महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले.

पूर्वी 'सर्व शिक्षा अभियाना'च्या माध्यमातून केंद्र सरकार शाळांच्या इमारतींसाठी निधी देत असे मात्र, सध्या राज्यातील अनेक शाळांची विशेषतः जिल्हा परिषद शाळांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे अशा शाळांच्या इमारतींच्या दुरुस्तीसाठी राज्य सरकारने विशेष निधीची तरतूद करावी, अशी मागणी आमदार कुल यांनी केली.

अनेक खासगी शाळा पालकांकडून अव्वाच्या सव्वा फी आकारत आहेत यावर नियंत्रण मिळवण्यासाठी प्राथमिक आणि माध्यमिक स्तरावर शुल्काची 'कमाल मर्यादा' निश्चित करणार का आणि नियम मोडणाऱ्या शाळांवर कारवाई होणार का? असा थेट प्रश्न आमदार राहुल कुल यांनी विचारला यावर उत्तर देताना मंत्री दादा भुसे यांनी सांगितले की, शालेय शुल्काच्या संदर्भात राज्य सरकार एक अभ्यासपूर्ण धोरण तयार करत असून, येणाऱ्या काळात या फी वर मर्यादा आणणारा कायदा केला जाईल.



सरकारने ज्या शाळा 'आदर्श शाळा' म्हणून विकसित केल्या आहेत, तेथील गुणवंत शिक्षकांना तेथेच कायम ठेवण्याची मागणी स्थानिक ग्रामस्थांची असते. मात्र, सध्याच्या बदलीच्या नियमांमुळे अशा शिक्षकांची बदली होते, ज्याचा परिणाम शालेय गुणवत्तेवर होतो. अशा परिस्थितीत अपवादात्मक अधिकार वापरून मंत्र्यांनी या बदल्या थांबवाव्यात, अशी मागणी कुल यांनी लावून धरली.

या प्रश्नांवर उत्तर देताना सरकारने शाळांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून देणे, शुल्क नियंत्रणासाठी कायदा करणे आणि शिक्षकांच्या बदल्यांबाबत सकारात्मक मार्ग काढण्याचे सकारात्मक आश्वासन दिले आहे. आमदार राहुल कुल यांनी मांडलेल्या या भूमिकेमुळे राज्यातील लाखो पालकांना आणि ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्थेला मोठा दिलासा मिळणार आहे.

## दौंड शहरात दोन ठिकाणी चोरीच्या घटना

**दौंड, ता. २७ :** दौंड शहरात सलग दोन ठिकाणी चोरीच्या घटना घडल्या आहेत. मंदिरातील दानपेटी फोडून रोख रक्कम लंपास करण्यात आली असून, दुसऱ्या घटनेत घरफोडी करून कपाटातील पैसे चोरून नेण्यात आले आहेत.

बुधवारी (ता. २५) रात्री आठ ते गुरुवारी (ता. २६) पहाटे सहा वाजण्याच्या सुमारास दौंड पाटस रोड येथील श्री १००८ चंद्रप्रभु दिगंबर जैन मंदिर येथे अज्ञात चोरट्यांनी चोरी केली. या प्रकरणी वैभव अशोक मडके (वय -३४, व्यवसाय -पेट्रोल पंप कर्मचारी, सध्या रा. श्री १००८ चंद्रप्रभु दिंगबर जैन मंदीर, दौंड -पाटस रोड ता. दौंड, जि पुणे. मुळ रा. वैराग ता. बार्शी, ता. सोलापूर) यांनी दौंड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चोरट्यांनी मंदिराचा मुख्य लॉक उघडण्याचा प्रयत्न केला; मात्र तो न उघडल्याने संगमरवरी जाळी असलेल्या उघड्या खिडकीतून आत प्रवेश केला. मंदिरातील दानपेटीचे कुलूप तोडून त्यातील अंदाजे दोन ते अडीच हजार रुपये रोख रक्कम चोरी करून नेली. याप्रकरणी दौंड पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसऱ्या घटनेत दौंड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शिवराज नगर परिसरात येथे घरफोडीची घटना घडली. रविवारी (ता. २२) सायंकाळी ५ ते बुधवारी (ता. २५) सायंकाळी सहा ते रात्री सव्वा दहा वाजण्याच्या सुमारास हि घटना घडली. याप्रकरणी संतोष वसंत चंदुरकर (वय ५४ वर्ष रा दर्पण अपार्टमेंट औंध, पुणे मुळ रा. शिवराज नगर, दौंड, ता. दौंड) यांनी फिर्याद दिली. त्यानुसार अज्ञात चोरट्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. अज्ञात चोरट्याने घराचा कडी-कोयंडा तोडून घरात प्रवेश केला. घरातील कपाटातून रोख रक्कम चोरी करून नेण्यात आली. याबाबत संतोष वसंत चंदुरकर (वय-५४) यांनी फिर्याद दिली आहे.

# खडकवासला बॅकवॉटरमध्ये तरुणाचा मृतदेह आढळला

**खडकवासला, ता. २८ :** येथील धरणाच्या बॅकवॉटर परिसरात पाण्यावर तरंगत असलेला एका तरुणाचा मृतदेह आढळून आल्याची घटना आज उघडकीस आली. हवेली आपत्ती व्यवस्थापन रेस्क्यू टीमच्या मदतीने मृतदेह पाण्यातून बाहेर काढण्यात आला.



मिळालेल्या माहितीनुसार, दीपक सपकाळ (वय २९, रा. सोनापूर, ता. हवेली, जि. पुणे) हा सध्या कोल्हेवाडी येथे वास्तव्यास होता. तो काल संध्याकाळपासून घरातून बेपत्ता होता. याबाबत नांदेड सिटी पोलीस स्टेशन येथे हरवल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती.

दरम्यान, आज खडकवासला बॅकवॉटर परिसरात फिरण्यासाठी आलेल्या पर्यटकांना पाण्यावर एक अनोळखी मृतदेह तरंगताना दिसला. त्यांनी तात्काळ ११२ या आपत्कालीन क्रमांकावर संपर्क साधून माहिती दिली. त्यानंतर संबंधित यंत्रणांना कळविण्यात आले.

माहिती मिळताच हवेली आपत्ती व्यवस्थापन प्रमुख तानाजी भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली रेस्क्यू टीम घटनास्थळी दाखल झाली. टीमचे सदस्य संजय चोरघे, योगेश गोपी व हरिदास कुंडलिकराव वऱ्हाड यांनी तत्परतेने पाण्यात उतरून मृतदेह बाहेर काढण्याची कारवाई केली.

मृतदेहाची ओळख पटवून पुढील पंचनामा व कायदेशीर प्रक्रिया पोलिसांकडून करण्यात आली असून मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होणार आहे. घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून पुढील तपास सुरू आहे.

# वडिलांच्या समोरच ट्रकचे चाक डोक्यावरून गेल्याने ३ वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू

**पुणे, ता. २८ :** कात्रज कडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर ट्रक आणि दुचाकी या वाहनांमध्ये झालेल्या अपघातात दुचाकीवरील तीन वर्षाच्या चिमुकल्याचा जागीच मृत्यू झाला. शनिवारी (ता. २८) सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास कात्रज परिसरातील वंडर सिटी समोरील मुख्य रस्त्यावर हा अपघात झाला.

अंश भाऊरंग कांबळे (वय -०३, रा. अंजनी नगर कात्रज) असे या मुलाचे नाव आहे. ट्रक चालक इंद्रजित बाबुराव जानते (वय ५०, रा. लातूर) याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वडील भाऊरंग कांबळे हे मुलगा अंशला घेऊन दुचाकीवरून (क्रमांक MH १२ TE २९३७) निघाले होते. कात्रजकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर वंडर सिटीसमोर



पाठीमागून येणाऱ्या ट्रकने (क्रमांक MH १९ CY ९५७२) त्यांच्या दुचाकीला जोरात धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, अंश ट्रकच्या चाकाखाली आला आणि त्याच्या डोक्यावरून चाक गेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. भारती विदयापीठ पोलीस व वाहतूक पोलीस घटना स्थळी दाखल झाले.

दरम्यान, कात्रज परिसरात अपघातांचे प्रमाण भयावह पद्धतीने वाढले आहे. या मार्गावर चोवीस तास अवजड वाहनांची वर्दळ असते, ज्यावर प्रशासनाचे नियंत्रण सुटल्याचे दिसते. तसेच रस्त्यावरील निसरडेपणामुळे दुचाकीस्वारांचे नियंत्रण सुटून अपघात होण्याचे प्रमाण मोठे आहे. अवघ्या आठ दिवसांपूर्वी कात्रज डेअरीसमोर झालेल्या अपघातात एका तरुणीचा मृत्यू झाला होता. ती घटना ताजी असतानाच आज पुन्हा एका चिमुरड्याचा बळी गेला आहे. त्यामुळे या ठिकाणी उपाययोजना करण्यात याव्यात अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# अजितदादा सोबत नाहीत, हे पचविणे कठिण जात आहे : सुप्रिया सुळे

**बारामती, ता. २८ :** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं २८ जानेवारी रोजी विमान अपघातात निधन झालं. त्यांच्या अकस्मात निधनामुळे संपूर्ण महाराष्ट्र हळहळला. आज त्यांना जाऊन एक महिना झाला तरीही त्यांच्या जाण्याचं दू:ख सामान्य नागरिकांच्या मनातून गेलेलं नाही. दरम्यान, आज खासदार सुप्रिया सुळे यांनी त्यांच्यासाठी पोस्ट केला आहे.

आपले अजितदादा सोबत नाहीत, हे पचविणे अजूनही कठिण जात आहे. अजितदादांच्या जाण्यामुळे निर्माण झालेली पोकळी कधीही भरुन निघणार नाही. दादा, तुम्ही कायम स्मरणात राहाल. तुमच्यासोबतच्या प्रसन्न क्षणांच्या आठवणी आयुष्यभर कायम सोबत राहतील, असं सुप्रिया सुळे म्हणाल्या.



दरम्यान, अजित पवारांचं निधन झालं तेव्हा सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवार अर्थसंकल्पीय अधिवेशनाकरता दिल्लीत होत्या. त्यांच्या कानावर ही बातमी पडताच त्या दोघीही लागलीच बारामतीच्या दिशेने आल्या. या प्रचंड वेदनेच्या काळात सुप्रिया सुळेंनी सातत्याने सुनेत्रा पवारांना आधार दिल्याचे व्हिडिओ समोर आले. तसंच, अंत्यविधीच्या संपूर्ण नियोजनताही सुप्रिया सुळेंनी जातीने लक्ष घातलं होतं. तसंच, सुप्रिया सुळेंनी उद्ध्वस्त असं व्हॉट्स ॲप स्टेटस ठेवून अजित पवारांच्या निधनाबाबत शोक व्यक्त केला होता. तर अजूनही विश्वास बसत नाहीय, असंही स्टेटस त्यांनी ठेवलं होतं.

# भावडी येथे गावठी दारू तयार करणारी महिला अटकेत

### ६ लाखांचा मुद्देमाल जप्त ; गुन्हे शाखा युनिट ६ ची कामगिरी

**वाघोली, ता. २८ :** नगर रस्ता परिसरातील भावडी गावात बेकायदा गावठी दारू तयार करणाऱ्या अड्ड्यावर गुन्हे शाखा युनिट ६ च्या पथकाने छापा टाकला. यावेळी गावठी दारू तयार करुन विक्री करणाऱ्या एका महिलेला अटक करण्यात आली. या कारवाईत पोलिसांनी गावठी दारू, तुरटी, तसेच गावठी दारु तयार करण्यासाठी लागणारे रसायन असा ६ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. अनिशा योगेश गुडदावत (वय २०रा. भावडी, ता. हवेली, नगर रस्ता) असे अटक करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नगर रस्त्यावरील भावडी गावातील मोकळ्या जागेत एक महिला गावठी दारू तयार करुन विक्री करत असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या युनिट सातमधील पोलीस कर्मचारी नितीन धाडगे आणि प्रतिक्षा पानसरे यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने गावठी दारू तयार करणाऱ्या भट्टीवर छापा टाकला.

या कारवाईत १८ लिटर तुरटी मिश्रित पाणी, गावठी दारू तयार करण्यासाठी लागणारे रसायन, अन्य साहित्य असा सहा लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. हातभट्टी तयार करणारी महिला अनिशा गुडदावत हिला ताब्यात घेण्यात आले. तिच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करुन अटक करण्यात आली.

हि कारवाई सहायक आयुक्त राजेंद्र मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष सोनवणे, सारंग दळे, गिरीष नाणेकर, निलेश साळवे, सुहास तांबेकर, प्रशांत कापुरे, निर्णय लांडे, नेहा तापकीर, सोनाली नरवडे, ऋषीकेश ताकवणे, बाळासाहेब तनपुरे यांनी ही कारवाई केली.

# मोदी–शहांनी अरविंद केजरीवाल यांची माफी मागावी : खासदार संजय राऊत

### दबावाखाली कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर खटला दाखल करावा

**मुंबई, ता. २८ :** दिल्लीतील कथित मद्य धोरण घोटाळ्यातून आम आदमी पक्षाचे प्रमुख संयोजक आणि दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्यासह २३ जणांची दिल्लीतील राऊज एव्हेन्यू न्यायालयाने निर्दोष सुटका केली. यामुळे मोदी सरकारला सणसणीत चपराक बसली आहे. या प्रकरणी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी माफी मागावी, तसेच दबावाखाली कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांचे निलंबन करून त्यांच्यावर खटला दाखल करावा, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते, खासदार संजय राऊत यांनी केली.

संजय राऊत म्हणाले, अरविंद केजरीवास, मनीष सिसोदिया, राज्यसभेचे खासदार संजय सिंह, काही अधिकारी, व्यापारी यांना सीबीआयने मद्य धोरण घोटाळ्याच्या आरोपांखाली अटक केली होती. राज्याच्या एका लोकनियुक्त मुख्यमंत्र्यांना जवळजवळ फरफटत घेऊन गेले हे संपूर्ण देशाने पाहिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि तेव्हाचे नायब राज्यपाल हे भाजपचे कार्यकर्ते असल्यासारखे वागत होते. या सगळ्यांनी केजरीवाल यांच्या बदनामीची प्रचंड मोहीम राबवली. मद्य धोरणात कोणताही गैरप्रकार झालेला नाही हे केजरीवाल सांगत होते. पण आधी लोकसभा



निवडणुका जिंकण्यासाठी आणि मग विधानसभा जिंकण्यासाठी हा विषय लावून धरण्यात आला. पण काल न्यायालयाने सांगितले की, हा खटला एवढा पोकळ आहे की तो टिकूच शकणार नाही. कोणताही पुरावा नाही, योग्य माहिती नाही. त्यामुळे सगळ्यांची जवळजवळ निर्दोष मुक्तता करण्यात आली.

हेमंत सोरने यांनाही मुख्यमंत्री असताना अशा प्रकारे अटक करण्यात आली होती. महाराष्ट्रात अनिल देशमुख गृहमंत्री होते, त्यांना तुरुंगात जावे लागले. नवाब मलिक मंत्री होते, त्यांनाही तुरुंगात जावे लागले. मलाही तुरुंगात जावे लागले. कोर्टात कुणी जामिनावर सुटले, कुणाला निर्दोष सिद्ध केले. आम च्यासारख्यांच्या अटका बेकायदेशीर आहे असे ईडी कोर्टाने सांगितले. पण कालचे चित्र जे होते हे खरे म्हणजे नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांना चपराक मारणारे होते, असे राऊत म्हणाले.

केजरीवाल यांच्या भ्रष्टाचारावर सगळ्यात जास्त आवाज अमित शहा आणि नरेंद्र मोदी यांनी उठवला. लोकसभेला दिल्लीतील ७ जागा जिंकायच्या होत्या आणि विधानसभा त्यांच्याकडून काढून घ्यायची होती म्हणून केजरीवाल यांना तुरुंगात टाकले हे काल सिद्ध झाले. त्यामुळे ज्या सीबीआय अधिकाऱ्यांनी बेकायदेशीरपणे, पुरावे नसताना केजरीवाल आणि त्यांच्या लोकांना अटक करून तुरुंगात टाकले त्या अधिकाऱ्यांवर गृहमंत्रालयाने कारवाई केली पाहिजे. त्या अधिकाऱ्यांचे निलंबन केले पाहिजे आणि त्यांच्यावर खटले चालवले पाहिजे, अशी मागणी राऊत यांनी केली.